अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १३५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ ।

सातपुतेंची सुपारी

घेतली कोणी? दिली कोणी?

- धैर्यशील, अर्जुनसिंह मास्टरमाईंड : सातपुते
- पोलीस आणि गुप्तचर यंत्रणांचा हवाला
- सातपुते, पालकमंत्री वैफल्यग्रस्त : धैर्यशील
- मुर्दाडाला मारणार कोण? : जानकर

सोलापूर/प्रतिनिधी

मारेकऱ्यांना सुपारी देऊन आपल्या हत्येचा कट रचण्यात आला असून खासदार धैर्यशील आणि अर्जुनसिंह मोहितेपाटील हे या कटाचे मास्टरमाईंड असल्याचा आरोप माजी आमदार राम सातपुते यांनी बुधवारी सोलापुरात केला. पोलीस आणि गुप्तचर यंत्रणाचा हवाला देत कांही संशयिताना ताब्यात घेत पोलिसांनी त्यांच्या आर्थिक व्यवहाराची तपासणी सुरु केल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, लोकसभा आणि विधानसभेतील अपयशाने पालकमंत्री आणि राम सातपुते हे वैफल्यग्रस्त झालेत असा पलटवार खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केला आहे, तर मुर्दाडाला कोण मारणार अशी खोचक प्रतिक्रिया आमदार उत्तम जानकर यांनी दिली आहे.

- पालकमंत्र्यांकडूनदेखील मंगळवारी सनसनाटी आरोप
- बाहेरच्या टोळीच्या माध्यमातून कट रचल्याचा प्रयत्न झाल्याची प्राथमिक तपासात माहिती
- माळशिरसमध्ये पोलीसांनी ठोकला तळ
- संशयितांना ताब्यात घेऊन पोलिसांकडून कसून चौकशी
- जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीनंतर सोलापूर जिल्ह्यात पेटलं राजकीय वातावरण
- लोकसभेच्या निवडणुकीनंतर मोहिते-पाटील अन् राम सातुपुते यांच्यामधील संघर्ष टोकाला

भाजपचे माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांनी आपल्या जीवाला धोका असल्याचा गंभीर दावा करत, आपल्या हत्येचा कट रचला गेल्याचे सोलापुरात पत्रकार परिषद घेऊन म्हटले आहे. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील आणि जिल्हा परिषद सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील या कटाचे मास्टरमाईंड' होते, या संदर्भात पोलिसांना आधीच गुप्त माहिती मिळाल्याने माळशिरस तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून पोलिसांनी तळ ठोकल्याची माहिती त्यांनी दिली. काही व्यक्तींना ताब्यात घेऊन चौकशी सुरू असल्याचे, तसेच त्यांच्या बँक व्यवहारांचीही तपासणी होत असल्याचे सातपुते यांनी सांगितले. हा प्रकार कॉन्ट्रॅक्ट किलिंग' स्वरूपाचा म्हणजे मारेकऱ्यांना सुपारी देऊन हत्या करण्याबद्दल असल्याचा संशय पोलिस आणि गुप्तचर यंत्रणांनी व्यक्त केल्याचे ते म्हणाले.

ग्रामविकास मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंगळवारी राम सातपुते यांच्या हत्येचा कट रचला गेल्याची माहिती मिळाल्याचे जाहीर केले होते. त्यांच्या विधानाने खळबळ माजली होती. त्यानंतर राम सातपुते यांनी माध्यमांशी संवाद साधत या विषयावर आपली भूमिका स्पष्ट केली. निवडणुकीच्या काळातच गुप्तचर विभाग आणि जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांना याबाबत काही माहिती मिळाली होती, त्यावरून तपास सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. बाहेरच्या टोळीच्या माध्यमातून हा कट रचण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती पुढे आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

सातपुते यांच्या मते, हा विषय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावरही घालण्यात आला आहे. जयकुमार गोरे यांनीही हा मुद्दा संबंधित स्तरावर मांडला असून, त्यानंतर पोलिस प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. माळशिरस तालुक्यात पोलिसांची उपस्थिती वाढली असून, संशयित व्यक्तींना चौकशीसाठी उचलण्यात आल्याचे ते म्हणाले. तपासाच्या भाग म्हणून काहींच्या आर्थिक व्यवहारांची माहितीही तपासली जात असल्याचे त्यांनी सांगितले. लोकांचे कारखाने बुडवणारे आणि जनतेला देशोधडीला लावणारे लोक जर सर्वसामान्य घरातून आलेल्या राम सातपुते यांच्या हत्येचा कट रचत असतील, तर आमचं नेतृत्व याची नक्कीच योग्य ती दखल घेईल. ज्यांचे राजकीय अस्तित्व धोक्यात आले आहे, असे काही लोक एकत्र येऊन कट रचत असल्याचे चित्र पुढे येत आहे. माळशिरस तालुक्यातील काही लोकांचा यामध्ये सहभाग असण्याची शक्यता आहे. संबंधित व्यक्तींना चौकशीसाठी बोलावण्यात आले असून तपास सुरू आहे, असे सातपुते यांनी सांगितले.

दरम्यान लोकसभा निवडणुकीनंतर सोलापूर जिल्ह्यात सातपुते आणि मोहिते पाटील यांच्यातील राजकीय संघर्ष टोकाला गेल्याचे या निमित्ताने, पुन्हा एकदा दिसून येत आहे.

राम सातपुते कोणत्याही स्तराला जातात : खा. धैर्यशील

भाजप आमदार राम सातपुते यांच्या हत्येचा कट रचला असल्याचा दावा खुद्द राम सातपुते यांनी केला असून यापूर्वी मंत्री जयकुमार गोरे यांनी देखील या संदर्भात गंभीर आरोप केले होते. राम सातपुते यांच्या हत्येच्या कटाचा तपास पोलिस करत असल्याची माहिती गोरे यांनी दिली आहे. याला राम सातपुते यांनी दुजोरा देत धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या गटातील काही लोक असल्याचे पुढे म्हटले आहे. आता यावर धैर्यशील मोहिते पाटील यांनी पलटवार केला आहे. धैर्यशील मोहिते पाटील म्हणाले, एकतर माळशिरस तालुक्याचा निकाल ९ पैकी ७ जिल्हा परिषद आम्ही जिंकल्या आहेत. सातपुते यांनी मीडिया मॅनेजमेंट करून एक जागा निवडून आणली, निवडणूक आली आणि पराभव झाला की ते प्रसिद्धी झोतात ठेवण्यासाठी कोणत्याही स्तराला जातात, असा पलटवार मोहिते पाटलांनी केला आहे. पुढे बोलताना धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले, राम सातपुते हे कोणत्याही स्तराला जाऊन कोणतीही बातमी देतात. माढा लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत पालकमंत्र्यांना पूर्ण अपयश आले म्हणून दोघेही वैफल्यग्रस्त झाले आहेत. म्हणूनच कामापासून लक्ष विचलित करणे, चुकीच्या दिशेने लोकांना घेऊन जायचे हे त्यांचे नेहमीचेच आहे. निवडणूक आल्यावर सपाटून आपटतात, म्हणून दारवेळेस त्यांच्या बुद्धीवर गंज चढतो आणि मग कोणत्याही स्तराला जातात, अशी टीका मोहिते पाटलांनी केली आहे.

धैर्यशील- अर्जुनसिंह कटामागील 'मास्टरमाईंड'

सातपुते यांनी पुढे सांगितले की, जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक आणि पालकमंत्री यांच्या स्तरावर हा विषय आधीच चर्चेत होता. त्यानंतरच त्यांना याची माहिती मिळाली. भविष्यात त्यांच्या जिवाला काही धोका निर्माण झाल्यास, त्याबाबत जबाबदार कोण असू शकते याची चिठ्ठी त्यांनी जयकुमार गोरे यांच्याकडे दिली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांनाही सर्व माहिती दिल्याचे ते म्हणाले. संवैधानिक पद्धतीने लढण्याची हिंमत संपल्यामुळे काही जण अशा मार्गाचा अवलंब करत आहेत, असा आरोप करत त्यांनी अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांनी राम सातपुतेच्या अंगावर कोणाला घालवायचं, असे विधान केल्याचा दावा केला. धैर्यशील मोहिते-पाटील आणि अर्जुनसिंह मोहिते पाटील हे या कटामागील मास्टरमाईंड' असल्याचा स्पष्ट आरोप त्यांनी केला. मात्र, हे आरोप सत्य आहेत की नाही, याचा तपास पोलिसांकडे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

खासदार धैर्यशील अन् अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांच्यावर थेट आरोप

या प्रकरणात सातपुते यांनी खा. धैर्यशील मोहिते-पाटील आणि अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांच्यावर थेट आरोप केला आहे. काही लोकांना पुढे करून अशा प्रकारचे कारस्थान केले जात असल्याची माहिती त्यांच्या कानावर आल्याचे ते म्हणाले. आम्ही संवैधानिक मार्गाने निवडणूक लढवतो, कायदा पाळतो. पण जर कोणी ठोकशाहीची भाषा करत असेल, तर हे अतिशय दुर्दैवी आहे, असे त्यांनी नमूद केले. हा प्रकार दोन दिवसांनी त्यांच्या लक्षात आल्याचेही त्यांनी सांगितले.

कायद्यावर विश्वास, तपासातून सर्व सत्य बाहेर येईल!

या सर्व घडामोडींमुळे सोलापूर जिल्ह्यात राजकीय वातावरण तापले आहे. पोलिस तपास सुरू असून, प्रशासन सतर्क आहे. सातपुते यांनी केलेले आरोप गंभीर स्वरूपाचे असल्याने या प्रकरणाकडे राज्यस्तरावर लक्ष लागले आहे. पुढील तपासातून नेमकी सत्यस्थिती स्पष्ट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सातपुते यांनी आपली भूमिका स्पष्ट करत, कायद्यावर विश्वास असल्याचे आणि तपासातून सर्व सत्य बाहेर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

राम सातपुतेंनी तोंडावर गुलालाची गन मारली

मतमोजणीच्या वेळेस सगळ्या पक्षाचे समर्थक एका जागेवर उभे असतात. पोलिसांनी दोनही पक्षाच्या लोकांना दूर ठेवले पाहिजे. मतमोजणीच्या वेळेस राम सातपुते तिथे गेले आणि त्यांनी आमच्या माने नावाच्या उमेदवाराच्या तोंडावर गुलालाची गन मारली, म्हणून तिथे गोंधळ झाला, असे धैर्यशील मोहिते पाटील यांनी सांगितले.सातपुतेंच्या पत्नीच्या विरोधात आमच्या कुटुंबातील उमेदवार देऊन त्यांना तिथेच अडकून ठेवण्याचे आमची व्युव्हरचना होती, त्यात आम्हाला यश मिळाले, असेही त्यांनी म्हटले.

दोषींवर निश्चित कारवाई : पालकमंत्री गोरे

माजी आमदार राम सातपुते यांच्या कथित हत्येच्या कटाच्या प्रयत्नाच्या अनुषंगाने, पोलीस तपास सुरु आहे, या तपासामधून सत्य निश्चितपणे बाहेर येईल, दोषींवर कठोर कारवाई होईल, असे पालकमंत्री जयकुमार गोरेंनी स्पष्ट केलं. राम सातपुते यांनी मास्टरमाईंड म्हणून धैर्यशील मोहिते-पाटील आणि अर्जुनसिंह मोहिते-पाटील यांची नावे घेतली आहे, त्याबद्दल काय सांगाल? या माध्यम प्रतिनिधीच्या प्रश्नावर गोरे म्हणाले की, नावे घेणं हा सातपुते यांचा विषय आहे. पोलीस चौकशी संपूर्ण होवू द्या, सत्य समोर येईल, असे ते म्हणाले.

कराचीच्या 'एनआयए' ने दखल घेतली का?: उत्तम जानकर

राम सातपुते यांनी केलेल्या दाव्यांवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांनी उपरोधक प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, आम्ही मैदानात लढणारी माणसं आहोत, असे सांगत जानकरांनी चोरीछुप्या कारवायांचा आरोप फेटाळला. राम सातपुते यांच्या अंगावर गेलेल्या लोकांना घाबरवण्यासाठीच पालकमंत्र्यांनी असे वक्तव्य केले असावे, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. या प्रकरणाची दखल कराचीच्या एनआयए' ने घेतली का, असा सवाल करत त्यांनी या प्रकरणावर टीका केली. राजकीय विरोधक म्हणून सातपुतेंसाठी काही करावे, असे मला वाटत नाही, असेही ते म्हणाले.निवडणुकीच्या काळात कार्यकर्त्यांमध्ये धराधरी, पकडापकडी अशा घटना घडतात, त्यात काही फार मोठा विषय नसतो, असे त्यांनी म्हटले. पालकमंत्र्यांनी जे वक्तव्य केले त्याबद्दल अधिक माहिती त्यांनाच असेल, असे सांगत जानकरांनी आरोपांची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला

जानकर मनोरुग्ण : सातपुते

हत्येच्या कटाच्या प्रकरणाच्या अनुषंगाने, राम सातपुते यांनी प्रसारमाध्यमांपुढे दिलेल्या माहितीवर माळशिरसचे आमदार उत्तम जानकर यांनी उपरोधिक टिका केली होती. त्यावर माजी आमदार राम सातपुते यांनी उत्तर दिलं आहे. ते म्हणाले , जानकरांना मानसिक आजाराच्या गोळ्या सुरु आहेत. मानसिक संतुनासाठी ट्रिटमेंट त्यांच्यावर सुरु असून ते अबालबुध्दीचे आहेत, भाजपच्या कार्यकर्त्यांनी विधानसभेला यांच्या तोंडाला फेस आणला होता. पंचायत समितीच्या निवडणुकीत यांच्या घरातील उमेदवार पाडला. माळशिरस तालुक्यात भाजपची ताकद वाढत आहे. त्यामुळे यांच्या पायाखालची वाळू सरकत आहेत. मुर्दाड माणसाला कोण मारणार?

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

'आज त्याचा बोर्डाचा पेपर होता' हे तो विसरला !

कल्याण
788-36-457

मुंबई
388-96-457

देवाभाऊ सरकारचा धडाकेबाज आणि ऐतिहासिक निर्णय

अकृषकसाठी एनएची सक्ती रद्द, जमीन मालकांना दिलासा

मुंबई

राज्यातील जिल्हा परिषदांच्या निवडणुकीची आचारसंहिता संपताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारकडून जनहिताच्या निर्णयाचा धडाकाच सुरू झाल्याचे पहायला मिळत आहेत.मंगळवारी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत फडणवीस सरकारकडून धडाकेबाज आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.यापुढे

जमीन मालकांना अकृषक अर्थात एनएच्या परवानगीची सक्ती रद्द करण्यात आली आहे.

त्यामुळे राज्यातील जमीन मालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्याच्या जमीन महसूल कायद्यात मोठे बदल करण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यात मोठा बदल करत बिगर कृषी वापरासाठी स्वतंत्र एनए परवानगीची आवश्यकता हटवण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र मंजुरी घेण्याची अट संपुष्टात आली आहे. फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्वाचा निर्णय जाहीर केला आहे.

बावनकुळे यांनी एनए (अकृषक) जमिनीसाठी स्वतंत्र परवानगी घेण्याची सक्ती रद्द केली आहे. यामुळे आता जिल्हाधिकाऱ्यांची स्वतंत्र एनए परवानगी घेण्याची गरज भासणार नाही तसेच बांधकामासाठी झालेला मंजूर आराखडा हीच एनए परवानगी असेल. तर अकृषक करही रद्द करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

आता रूपांतरण अधिमूल्य

नव्या निर्णयानुसार आता अकृषक कर आकारला जाणार नाही. तर जमीन मालकांना फक्त एकरकमी 'रुपांतरण अधिमूल्य' भरावे लागेल. या रकमेच्या भरपाईनंतर जमीन अकृषक वापरासाठी रूपांतरित होईल. याशिवाय, बांधकाम आराखडा मंजुरी असल्यास सनद घेण्याची गरज देखील असणार नाही. तीच मंजुरी एन.ए. असेल. या निर्णयामुळे जमीन रूपांतर प्रक्रिया जलद, सोपी आणि पारदर्शक होईल.जमीन मालकांना जमीन अकृषक वापरासाठी रूपांतरित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घ्यावी लागत होती. त्याचबरोबर एन.ए.साठीही अनेक कागदपत्रे सादर करावी लागत होती. जे जिकरीचे आणि वेळ खाऊ काम होते. पण आता महसूल विभागाने तयार केलेल्या नवीन कार्यपद्धतीनुसार बांधकाम आराखडा मंजुरीच एन.ए. मानले जाईल. ही महसूल विभागासाठी ही कार्यपद्धती लागू झाली असून, राजपत्रात देखील ती प्रकाशित करण्यात आली आहे.

काही प्रश्न अन् उत्तरे ...

प्रश्न : नवीन बदलानुसार एनए परवानगी घ्यावी लागेल का?
उत्तर : नाही, बिगर कृषी वापरासाठी स्वतंत्र एनए परवानगीची आवश्यकता आता राहणार नाही.
प्रश्न : जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी आवश्यक आहे का?
उत्तर : नवीन निर्णयानुसार स्वतंत्र मंजुरी घेण्याची अट काढून टाकण्यात आली आहे.
प्रश्न : हा निर्णय कोणाच्या सूचनेनुसार घेतला?
उत्तर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा बदल केला.
प्रश्न : जमीन मालकांना याचा काय फायदा होईल?
उत्तर : जमीन रूपांतर प्रक्रिया सोपी होऊन वेळ आणि प्रशासकीय अडथळे कमी होतील.
प्रश्न : हा बदल केव्हा लागू होणार आहे?
उत्तर : सरकारकडून अधिकृत अधिसूचना जाहीर झाल्यानंतर हा बदल लागू होईल.